# संत मायकल धर्मग्राम, माणिकपूर, वसई    पवित्र आठवडा २०२६

| | |
|---|---|
| **गुरूवार**<br>दि. २६ मार्च | **संध्याकाळी ६.००** वाजता पवित्र तेलांना आशीर्वाद विधी व मिस्सा, कॅथीड्रल ऑफ अवर लेडी ऑफ ग्रेस, पापडी |
| **रविवार**<br>दि. २९ मार्च<br> | **सकाळी ६.५०** वाजता झावळ्यांना आशीर्वाद व ७.०० वाजता मिस्सा<br>**संध्याकाळी ५.३०** वाजता क्रुसाच्या वाटेची भक्ती, मिरवणूक, वेरोणिकाचे गाणे, उपदेश आणि आशीर्वाद विधी सर्वांसाठी |
| **सोमवार**<br>दि. ३० मार्च | **सकाळी ९.०० वाजता** आजारी व विकलांगांसाठी मिस्सा |
| **आज्ञा गुरूवार**<br>दि. ०२ एप्रिल<br> | **संध्याकाळी ५.०० वाजता** इंग्रजी मिस्सा व पायधुणी – **चर्च आवारात**<br>**संध्याकाळी ७.०० वाजता** मराठी मिस्सा व पायधुणी – **चर्च आवारात**<br>..........................................................................................<br>**रात्री ९.०० नंतर आराधना क्रम**<br>०९.०० – इंग्रजी विभाग<br>०९.३० – चौक, फडबाव, कान्व्हेंट, गवणीघर, तलाव<br>१०.०० – पीठा व चुळणा रोड, मेरीव्हिला, बी.के.एस<br>१०.३० – नौपाडा, खारटण<br>११.०० – बरामपूर<br>११.३० – चर्च रोड, कुंभारवाडा, तलखल व खालची व वरची आळी, मार्केट विभाग, चिंचकोंबडा |
| **शुभ शुक्रवार**<br>दि. ०३ एप्रिल<br>उपवासाचा दिवस | **सकाळी ७.०० वाजता** चर्च आवारात क्रुसाच्या वाटेची भक्ती **(मराठी)**<br>**सकाळी ९.०० वाजता** चर्चमध्ये क्रुसाच्या वाटेची भक्ती **(English)**<br>**संध्याकाळी ४.०० वाजता** विधी चर्चमध्ये **(English)**<br>**संध्याकाळी ६.०० वाजता** विधी चर्च आवारात **(मराठी)**<br> |
| **पवित्र शनिवार**<br>दि. ०४ एप्रिल | **सकाळी ७.०० वाजता** दु:खी मातेची भक्ती<br>Easter Vigil **संध्याकाळी ७.०० वाजता (English)** Church Compound<br>पुनरूत्थानपूर्व जागरणविधी **रात्री ९.०० वाजता (मराठी)** चर्च आवारात<br>(कृपया मेणबत्त्या आणाव्यात) |
| **पास्का पुनरुत्थानाचा रविवार** दि. ०५ एप्रिल<br> | **सकाळी मिस्सा ६.००, ७.००, ९.१५ वाजता (मराठी)**<br>**८.१५ वाजता (English)**<br>**पास्का रविवारी संध्याकाळी मिस्सा होणार नाही.**<br>**दुपारी १२ वाजता** प्रत्येक कुटुंब प्रमुखाने आपले घर आशीर्वादित करावे.<br>पवित्र पाण्याचे वाटप आपआपल्या शेजोळप्रमुखाकडून होईल. |

**Alleluia**    **सर्वांना ख्रिस्ताच्या पुनरूत्थानाच्या शुभेच्छा!**    **आल्लेलुया**

**सूचना**: फक्त पुनरूत्थान काळात (२४ मे २०२६ पर्यंत) 'दूताचा मरियेला संदेश' हया प्रार्थनेऐवजी 'स्वर्गाचे राणी' ही प्रार्थना म्हणावी.

**पास्का सकाळी आपल्या घरी कौटुंबिक आशीर्वादाची प्रार्थना पुढीलप्रमाणे:**



**सर्व** : पिता आणि पुत्र आणि पवित्र आत्मा यांच्या नावे, आमेन

**सर्व** : (स्तोत्र १२७ पासून) ''प्रभूने घर बांधले नाही, तर बांधणारे व्यर्थ खटाटोप करतात.''

**शास्त्रवाचन**: मला 'प्रभूजी, प्रभूजी' म्हणणाऱ्या प्रत्येकाला स्वर्ग राज्यात प्रवेश मिळेल असे नाही, तर माझ्या पित्याच्या इच्छेप्रमाणे वागणाऱ्यांनाच केवळ मिळेल. तेव्हा हे माझे बोल ऐकून त्याप्रमाणे वागणारा प्रत्येक जण आपले घर खडकावर बांधणाऱ्या माणसासारखा समंजस ठरेल.

**विनंत्या**

१) प्रभो ज्यांना राहायला घर नाही, त्यांचे रक्षण कर. अशा लोकांवर कोणत्याही प्रकारचा अन्याय होऊ नये

**उत्तर: (सर्वजण म्हणतात): हे प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**



२) प्रभो, प्रत्येक घरात कौटुंबिक शांती नांदू दे. ज्यांच्या घरात भांडण, तंटा, संशय, समस्या आहेत, अशांना लवकर या संकटातून सोडव.

**उत्तर: (सर्वजण म्हणतात): हे प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

३) **पालकांसाठी** : प्रभो, प्रत्येक घरात आई–वडिलांनी लेकरांना योग्य मार्गदर्शन करावे आणि अहिंसक व प्रेमळ मार्ग त्याना दाखवावा.

**उत्तर: (सर्वजण म्हणतात): हे प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

४) **लेकरांसाठी**: प्रभो, प्रत्येक कुटुंबात सर्व मुला–मुलींना सुरक्षित ठेव. भावनिक, नैतिक व आर्थिक सोयी त्यांना मिळाव्या म्हणून

**उत्तर: (सर्वजण म्हणतात): हे प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

५) **वयस्कर माणसांसाठी** : वयोवृध्द माणसांची काळजी घेतली जावी, त्यांच्याकडे दुर्लक्ष होऊ नये, आपणामध्ये बंधुप्रेम वाढीस लागावे म्हणून

**उत्तर: (सर्वजण म्हणतात): हे प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

**शेवटची प्रार्थना: (कुटुंब प्रमुख)** प्रभो, तुझ्या मूल्यांवर, तत्त्वांवर, अशा खडकांवर आम्ही आमचे कुटुंब बांधावे अशी कृपा दे. एकमेकांना न्याय व प्रेम आम्ही दाखवावे, एकमेकांचे गुणदोष आम्ही सहनशीलतेने आणि मोठ्या हृदयाने स्वीकारावेत, म्हणून आम्हाला कृपा व शक्ती दे. व आमचे शत्रू, मित्र, आप्त व बंधू–भगिनी, या सर्वांना सुखरूप ठेव. ही प्रार्थना आम्ही प्रभू येशू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

(शेवटी पवित्र पाणी घराच्या कानाकोपऱ्यात शिंपडावे)